## थोडक्यात...

### ओबीसी प्रमाणे मराठा समाजास संपूर्ण सवलती;सरकारचा ऐतिहासीक निर्णय




(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)

**बीड** – मराठा समाजाच्या आर्थिक व शैक्षणीक प्रगतिला गती देण्यासाठी राज्य सरकारने आज अत्यंत महत्व पूर्ण निर्णय घेत इतर मागासप्रवर्गाच्या सर्व सवलती मराठा समाजासाठी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे त्या नुसार ऊच्च व व्यावसायिक शिक्षण घेतांना मराठा समाजातिल हजारो विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे महाराष्ट्राचे रहिवाशी असलेले परंतू पर राज्यातील अनुदानित / विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सवलती साठी ओबीसी प्रमाणेच मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना ही सर्व सुविधा दिल्या जाणार आहेत या निर्णया मूळे मराठा समाजातून मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त होत असून मराठा समाजातील ऊच्च शिक्षणापासून वंचित घटकांना मोठा फायदा होणार आहे.

### जनगणनेसाठी मनपा आयुक्त घरोघरी भेट –वेळेत माहिती देण्याचे केले आवाहन

(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)

**परभणी–** शहर महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या जनगणना सर्वेक्षण मोहिमेतंर्गत आयुक्त नितीन नार्वेकर यांनी शनिवारी(दि. ५)थेट जनतेशी संवाद साधत नागरिकांनी जनगणनेसाठी अचूक माहिती देण्याचे आवाहन केले. महानगरपालिकेमार्फत जनगणना सर्वेक्षणासाठी प्रगणक, पर्यवेक्षक आणि चार्ज अधिकारी घरोघरी जाऊन नागरिकांकडून माहिती संकलित करत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्त नितीन नार्वेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शनिवारी व रविवारी बहुतांश नागरिक घरी उपलब्ध असतात, या अनुषंगाने सर्वेक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. शनिवारी आयुक्तांनी स्वतः शहरातील मुमताजनगर, मेहराज नगर, धाररोड, सरफराजनगर, पार्वती मंगल कार्यालय परिसर, नाथनगर आदी भागांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वाजेदरम्यान घरोघरी भेटी देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नागरिकांना जनगणनेची माहिती अचूकपणे देण्याचे आवाहन केले. तसेच प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याकडून सर्वेक्षणाचे काम योग्य पद्धतीने सुरू आहे का ? याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सहाय्यक आयुक्त अलकेश देशमुख, जुबैर हाशमी, जनगणना व्यवस्थापक शेख अरशद, प्रमुख रामेश्वर कुलकर्णी, चार्ज अधिकारी अवेज हाशमी तसेच जनगणना अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### पिंपरी फाट्यावर बस–दुचाकीची भीषण धडक; आजी, आजोबा व नातवाचा जागीच मृत्यू

(संतोष तायडे /दै.धर्मयोध्दा)

**बोरी** – परभणी–जिंतूर मार्गावरील कोकजवळील पिंपरी फाट्यावर शनिवारी सायंकाळी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात आजी, आजोबा आणि नातू अशा तिघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिंतूर तालुक्यातील शेवडी येथील रहिवासी भगवान बळीराम काळे (वय ६०), सुशीला भगवान काळे (वय ५०) आणि शिवम गजानन काळे (वय १२) हे कोडगाव (ता. जिंतूर) येथे धोंडे जेवणाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून ते दुचाकीवरून परतत असताना पिंपरी फाट्यावर जिंतूरहून परभणीकडे जाणाऱ्या बस एमएच १३ सी यु ७८३३ची त्यांच्या दुचाकी क्रमांक एम एच ३८ के ६६८२ला समोरासमोर धडक बसली. धडक इतकी जोरदार होती की दुचाकी बसखाली घुसली. या भीषण अपघातात तिघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर तिघांना बोरी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धोंडगे व पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. या दुर्दैवी अपघातामुळे शेवडी गावासह परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण करणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत दोन सामंजस्य करार;महाराष्ट्रात ४,०८० कोटींची गुंतवणूक; ४,७५० रोजगारांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निर्मिती

**मुंबई** - राज्य शासनाला केवळ प्रशासन म्हणून नव्हे, तर तुमचा भागीदार समजा. राज्यात संपूर्ण औद्योगिक परिसंस्था उभी राहावी, ही राज्य शासनाची भूमिका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असलेल्या महाराष्ट्राला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात देशातील इतर राज्यांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे उद्योगांच्या विस्तारासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजकांना दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘वर्षा’ निवासस्थानी महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील आघाडीची जबिल तसेच महाराष्ट्र शासन आणि दुबईस्थित आरएसए ग्लोबल यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे महाराष्ट्रात ४ हजार ८० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ४ हजार ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी निर्माण होणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या दोन्ही प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणूक, निर्यात क्षमता आणि आधुनिक लॉजिस्टिक्स व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला वेग मिळेल. तसेच इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रस्थान आणखी मजबूत होणार आहे.

पुण्यात जबिलचा १,५०० कोटींचा विस्तार प्रकल्प

जबिल कंपनी पुण्यात इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस (ईएमएस) विस्तार प्रकल्प उभारणार आहे. ५जी उपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित नेटवर्किंग स्विचगिअर्सच्या उत्पादनासाठी कंपनी १ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून सुमारे ४ हजार थेट रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्रात गेली २३ वर्षे कार्यरत असलेल्या जबिलचे राज्यात १० हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीची नवी अत्याधुनिक उत्पादन सुविधा १७ जून २०२६ रोजी सुरू होणार आहे.

रायगडमध्ये अल्ट्रा मेगा लॉजिस्टिक्स पार्क

महाराष्ट्र शासन आणि आरएसए लॉजिस्टिक्स अँड ट्रान्सपोर्टेशन प्रा. लि. यांच्यात झालेल्या दुसऱ्या सामंजस्य करारानुसार रायगड जिल्ह्यातील उरण येथील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) परिसरात २५ हेक्टर क्षेत्रावर अत्याधुनिक ‘अल्ट्रा मेगा लॉजिस्टिक्स पार्क’ उभारण्यात येणार आहे.

या प्रकल्पासाठी २ हजार ५८० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून सुमारे ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. कंटेनर स्टॅकिंग, कंटेनर धुलाई व स्वच्छता, दुरुस्ती, रिकाम्या कंटेनर्सची हाताळणी आणि साठवण यांसारख्या अत्याधुनिक सुविधा येथे विकसित करण्यात येणार आहेत.

उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, जबिलचे ग्लोबल सीईओ माईक दस्तूर, व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, उपाध्यक्ष देबाशीष चौधरी, संचालक संतोष भगवत तसेच आरएसए ग्लोबलचे अध्यक्ष अजय इंद्रवदन शाह, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक प्रकाश राव आणि मानव संसाधन प्रमुख मोहन लिमये यावेळी उपस्थित होते.

## मंत्री पंकजाताई मुंडे यांनी घेतले पुरुषोत्तमपुरी येथे भगवंत दर्शन



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**माजलगाव-** सध्या आधिकमास चालू असल्याने काल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी मातोश्री समवेत माजलगाव तालुक्यातिल पुरुषोत्तमपुरी येथे दर्शन घेतले दरम्यान पत्येक गावात जागो जागी पंकजाताई यांचे जंगी स्वागत फटाके फोडून व घोषणा देत कार्यकर्ते करत होते पुरुषोत्तमपुरी येथे भगवंताची पुजा मातोश्री प्रज्ञा मुंडे सह मंत्री पंकजा ताई यांनी करत सर्वसामान्य जनतेच्या जिवनात सुख समृध्दी लाभो बळीराजा सुखी होवो अशा भावना व्यक्त केल्या या वेळी त्यांचे समवेत भाजपा राज्य परीषद सदस्य अरुण आबा राऊत डॉ . अशोक तिडके ज्ञानेश्वर मेंडके महिला मंडळ प्रमुख रूपाली ताई कचरे भाजपा शहर प्रमुख विनायक रत्नपारखी अभिजित सोळंके दीपक मुंडे भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे आदी सह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जलसंवर्धन ही काळाची गरज; युवकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी अशीमा मित्तल




(नवनाथ गव्हाणे /दै.धर्मयोध्दा)

**जालना-** माय भारत, जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ‘जलदिंडी अभियानाचा’ समारोप जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पाडळी (ता. बदनापूर) येथे उत्साहात संपन्न झाला. दि. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानाद्वारे जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जलदान करून आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी पाथ्रीकर कॅम्पसचे संचालक डॉ. देवेशजी पाथ्रीकर होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, तहसीलदार अतुल बने, भाजपा तालुकाध्यक्ष भगवानराव मात्रे,डॉ. रामदास निहाळ, अमृत तारो आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा तुळशीच्या रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढते जलसंकट, भूजल पातळीतील सातत्याने होत असलेली घट आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम लक्षात घेता युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## गेवराई बाजार येथे राज्याभिषेक सोहळा व कृषी कन्या ‘रावे’ उपक्रमांतर्गत कार्यक्रम उत्साहात

(नवनाथ गव्हाणे /दै.धर्मयोध्दा)

**बदनापुर** - गेवराई बाजार येथे राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात कृषी कन्या ‘रावे’ उपक्रमांतर्गत कृषी महाविद्यालय बदनापूर येथील विद्यार्थिनींचा सहभाग विशेष आकर्षण ठरला.



या कार्यक्रमात गावातील नागरिक, युवक तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शेतीविषयक मार्गदर्शन, आधुनिक शेती पद्धती, तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती सादर केली.

या प्रसंगी सरपंच मीरा कारभारी देवकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात कृषी शिक्षण व शेतकरी-विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक मजबूत होण्याची गरज व्यक्त केली. तसेच ‘रावे’ उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व शेतीतील अडचणी यावर चर्चा करण्यात आली. विद्यार्थिनींच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक ज्ञानवर्धक व प्रभावी ठरला.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## चाणक्य इंग्लिश स्कूलमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



(बाळासाहेब ढेरे/दै.धर्मयोध्दा)

**घनसावंगी-** येथील चाणक्य इंग्लिश स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्य स्थापनेतील योगदान आणि आदर्श नेतृत्वाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे, घोषवाक्ये आणि विविध उपक्रमांद्वारे शिवचरित्राविषयी आपली भावना व्यक्त केली. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका मुक्ता सपाटे, शिक्षिका इमराणा सय्यद, दिक्षा परिहार, मंजुषा कोरडे, दीपा बोराडकर, भाग्यश्री शिंदे तसेच शिक्षक रामेश्वर देशमुख, मुशरफ शेख, मानसिंग पाटील, सचिन आरगडे आणि कृष्णा देवडे उपस्थित होते. मुख्याध्यापिका मुक्ता सपाटे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श विचारांचे अनुसरण करून जीवनात प्रामाणिकपणा, शिस्त, धैर्य आणि राष्ट्रप्रेम जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवत शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

## तीन वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता महसूल प्रशासनाने केला खुला

(गजेंद्र साखरे /दै.धर्मयोध्दा)

**सिद्धनाथ बोरगाव** - (ता. सेलू) : येथील शेतकरी श्री. बाबासाहेब हरिभाऊ लिपणे यांच्या शेताकडे जाणारा रस्ता गेल्या तीन वर्षांपासून अडविण्यात आला होता. या प्रकरणी तहसीलदार सेलू यांनी वेळोवेळी सुनावणी घेऊन तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मामलेदार कोर्ट अ‍ॅक्ट, १९०६ अंतर्गत शेतरस्ता खुला करण्याचा आदेश दिला होता.

दरम्यान, संबंधित आदेशाविरोधात वादी पक्षाने उपजिल्हाधिकारी, सेलू यांच्याकडे अपील दाखल केले होते. या अपीलाची सुनावणी दिनांक १ जून २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी श्री. लाहोटी यांच्या समोर झाली. सुनावणीदरम्यान वादी पक्षाकडून श्रीकृष्ण शंकर लिपणे उपस्थित होते, तर प्रतिवादी बाबासाहेब हरिभाऊ लिपणे, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच विधिज्ञ उपस्थित होते.




वादी पक्षाने दाखल केलेल्या स्थगिती अर्जावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून स्थगिती अर्ज फेटाळण्यात आला.

त्यानंतर तहसीलदार श्री. मगर यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार श्री. इनामदार यांना आदेशाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत करण्यात आले. बाबासाहेब लिपणे यांना गट क्रमांक २२१ मध्ये जाण्यासाठी गट क्रमांक २२० व २२१ यांच्या बांधावरून कायमस्वरूपी शेतरस्ता खुला करून देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

संबंधित पक्षकारांना नोटीस देऊन तसेच दूरध्वनीद्वारे संपर्क साधूनही शंकर रामभाऊ लिपणे, नारायण तात्याराव सोनपावले, नागनाथ विष्णुपंत सोनपावले व सुभाष विष्णुपंत सोनपावले हे प्रत्यक्ष कारवाईवेळी उपस्थित राहिले नाहीत.

दिनांक १ जून २०२६ रोजी खरीप हंगामाच्या पेरणीपूर्वी महसूल प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात प्रत्यक्ष कारवाई केली. नायब तहसीलदार श्री. इनामदार, मंडळ अधिकारी श्री. नांदापूरकर, तलाठी श्री. मोताळे तसेच पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत सिद्धनाथ बोरगाव–लिंगसा रस्त्यापासून गट क्रमांक २२० व २२१ च्या दक्षिण–उत्तर बांधाची मोजणी करून टेपद्वारे हद्द निश्चित करण्यात आली. त्यानंतर जेसीबीच्या साहाय्याने बांधावरील झाडी साफ करण्यात आली. तसेच शंकर रामभाऊ लिपणे यांच्या ऊस पिकाचे कमीत कमी नुकसान होईल याची दक्षता घेत बाबासाहेब हरिभाऊ लिपणे यांच्या शेताकडे जाणारा शेतरस्ता खुला करण्यात आला.

ही कारवाई सायंकाळी ५.०० वाजता सुरू होऊन सुमारे ६.१५ वाजता पूर्ण झाली. तहसीलदार सेलू यांच्या आदेशाची अंमलबजावणी पंच व पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी नायब तहसीलदार श्री. इनामदार, मंडळ अधिकारी श्री. नांदापूरकर, तलाठी श्री. मोताळे, पोलीस अधिकारी जी. आर. राठोड, एस. एस. कदम तसेच पंच म्हणून ज्ञानेश्वर अच्युतराव लिपणे, वशिष्ठ काशिनाथ लिपणे, सुशांत सुधाकर लिपणे, सत्यनारायण हनुमंत लिपणे, अजय वशिष्ठ लिपणे आणि शेतकरी बाबासाहेब हरिभाऊ लिपणे उपस्थित होते.

## अन्न व औषध प्रशासनाची जालना जिल्ह्यात धडक कारवाई; भेसळयुक्त खाद्यतेल, गुटखा व लेबलदोषयुक्त पेयांचा लाखोंचा साठा जप्त




(रामदास पाटेकर/ दै.धर्मयोध्दा)

**अंबड–** अन्न व औषध प्रशासन विभागाने दि. ५ रोजी जिल्ह्यात अन्नसुरक्षा व ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष मोहीम राबवत विविध ठिकाणी धडक कारवाई केली. या कारवाईत भेसळयुक्त खाद्यतेल, प्रतिबंधित गुटखा तसेच लेबलदोषयुक्त ऊर्जा पेयांचा एकूण सुमारे ३ लाख ९५ हजार ५९९ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

प्रथम कारवाईत अंबड येथील भगवती ट्रेडर्स या आस्थापनावर तपासणी करण्यात आली. यावेळी भेसळयुक्त असल्याचा संशय असलेल्या खाद्यतेलाचा साठा आढळून आला. संबंधित तेलाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून ३५८ किलो वजनाचा व ५७ हजार २८० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत अंबड तालुक्यातील शहागड येथील रहिम रहमान शेख याच्या ताब्यातून प्रतिबंधित अन्नपदार्थ गुटख्याचा मोठा साठा आढळून आला. या प्रकरणात गुटखा व वाहने असा एकूण २ लाख १९ हजार ७१९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

तिसऱ्या कारवाईत जालना येथील समर्थ एजन्सी येथे तपासणी दरम्यान इलेक्ट्रोलाइट एनर्जी ड्रिंक या उत्पादनाच्या लेबलमध्ये अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळून आले. त्यामुळे १ लाख १८ हजार ६०० रुपये किमतीचा लेबलदोषयुक्त साठा जप्त करण्यात आला असून संबंधित प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या अन्नपदार्थांच्या विक्री व वितरणाविरुद्ध कारवाईचा धडाका सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच नागरिकांनी भेसळयुक्त किंवा संशयास्पद अन्नपदार्थ, प्रतिबंधित गुटखा अथवा नियमबाह्य उत्पादनांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न) नि. सु. कुलकर्णी यांनी केले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao